गडकरी मंचावर असताना बांगलादेशला भारतात विलीन करण्याची मागणी >>पान 2

विलासराव देशमुख यांच्याबद्दलच्या विधानासाठी माफी मागतो >>पान 3

अरेगाव रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात राकाँ.(शरद पवार गट) आक्रमक >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 152 ■ बुधवार, दि. 07 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

स्वानुभूति हेच माझे मत.
– भगवान गौतम बुद्ध



यश स्टारर 'टॉक्सिक' चित्रपटातील मेलिसाच्या भूमिकेतील रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक प्रदर्शित...

आतील पान

# अजित पवारांनी कधी सावरकरांचा विरोध केला नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीमधील भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि अजित पवारांची राष्ट्रवादी अनेक ठिकाणी आमने-सामने आले आहेत. असं असतानाच महायुतीमधील नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत असल्यामुळे राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे.

यातच भाजपा नेते आशिष शेलार यांनी अजित पवारांवर टीका केली आहे. 'अजित पवारांना सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील', असं



आशिष शेलारांनी म्हटलं आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया देत सूचक भाष्य केलं आहे. 'अजित पवारांनी कधी सावरकरांचा विरोध केला नाही आणि सावरकरांच्या विचारांना विरोध आम्हाला मान्य नाही', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

भाजपा नेते आशिष शेलार यांनी अजित पवारांबाबत केलेल्या वक्तव्यानंतर पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, ''मला असं वाटतं की वीर सावरकरांच्या विचारांना अजित पवारांनी विरोध करण्याचं कारण नाही आणि त्यांनी कधी सावरकरांच्या विचारांना विरोध केला नाही. आजपर्यंत तरी त्यांनी विरोध केल्याचं मी पाहिलं नाही. मात्र, आमची भूमिका पक्की आहे की, वीर सावरकरांच्या विचारांना विरोध आम्हाला मान्य नाही'', असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

आशिष शेलार काय म्हणाले होते?

''आमचे रवींद्र चव्हाण हे म्हणाले आहेत की आम्ही सावरकरांचे भक्त आहोत. सावरकरांच्या विचारांवर चालणारे लोक आम्ही आहोत. त्यामुळे अजित पवार यांच्या पक्षाला (राष्ट्रवादीला) देखील सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. आमचे विचार असे आहेत की तुम्ही याल तर आम्ही तुमच्या बरोबर, न याल तर तुमच्याशिवाय. विरोधात गेलात तर तुमच्या विरोधात. आम्ही आमचं काम करू'', असं म्हणत आशिष शेलार यांनी अजित पवार यांना इशारा दिला.

''प्रिय आशिष शेलारजी, दादा व दादांचा पक्ष तुमच्या ''आदर्शाच्या'' नेतृत्वावरच चालला पाहिजे हा जो तुमचा अट्टाहास आहे व हे जे तुम्ही ठासून सांगत आहात त्यात किती तथ्य आहे हे तुम्हालाच माहीत. तुर्तास इतकंच सांगेल आम्ही ''शिव, शाहु, फुले, आंबेडकरी'' चळवळीशी बांधील व प्रामाणिक होतो, आहोत आणि राहु. तुम्हाला अपेक्षित विचारधारा आम्ही जरी स्वीकारत नसलो तरी आमच्या पक्षाची आंबेडकरी विचारधारा तुम्हाला नाईलाजाने का होईना स्वीकारावीच लागते हे त्रिवार सत्य आहे'', असे म्हणत अमोल मिटकरी यांनी आशिष शेलार यांना प्रत्युत्तर दिले आहे.

## शनीशिंगणापूर रस्त्यावर भीषण अपघात, ट्रॅव्हलरने रिक्षाला उडवले; ५ जणांचा जागेवर मृत्यू

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** राहुरी-शनीशिंगणापूर मार्गावर रोडवर अत्यंत भीषण अपघात घडला. उंबरे (ता. राहुरी) गावाच्या हद्दीत तांबे पेट्रोलपंपाजवळ भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर आणि रिक्षाची जोरदार धडक झाल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत रिक्षातील पाच जणांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर टेम्पो ट्रॅव्हलरही रस्त्याच्या कडेला पलटी झाला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शनीशिंगणापूरकडे जाणारा भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर राहुरीकडून येणाऱ्या रिक्षावर आदळला. धडक इतकी जोरदार होती की रिक्षा अक्षरशः उडाली. रिक्षामध्ये बसलेले पाच प्रवासी गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर काही वेळातच त्यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. मात्र अधिकृत आकडेवारी आणि ओळख पोलिस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

या अपघातात टेम्पो ट्रॅव्हलरमधील प्रवासीही जखमी झाले असून, काहींना गंभीर दुखापत झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना बाहेर काढून रुग्णवाहिकेच्या मदतीने राहुरी व अहमदनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातामुळे काही काळ शनीशिंगणापूर रोडवरील वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला असून, वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शनीशिंगणापूर रोडवरील वाढती अपघातांची संख्या पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरली असून, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ऐन निवडणुकीच्या तोंडावर राहुल नार्वेकरांच्या अडचणीत वाढ, कुलाबा मतदारसंघातील वाद थेट हायकोर्टात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कुलाबा मतदारसंघातील प्रभागांमधील उमेदवारी अर्ज दाखल करण्यावरून सुरू झालेला वाद आता थेट मुंबई उच्च न्यायालयात पोहचला आहे. राहुल नार्वेकरांच्या कृती विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. राहुल नार्वेकर यांनी हस्तक्षेप केल्याचा याचिकेत आरोप करण्यात आला आहे. यामुळे मुंबई महापालिका निवडणूक तोंडावर असताना राजकारणात खळबळ माजली आहेमुंबई महानगरपालिकेच्या रणधुमाळीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर गंभीर आरोप केले जात आहेत. राहुल नार्वेकरांनी पदाचा गैरवापर करत इच्छुक उमेदवारांना अर्जच भरू न दिल्याचा याचिकेतून आरोप करण्यात आला आहे. प्रभाग २२४,२२५,२२६ आणि २२७ मधील वाद मुंबई उच्च न्यायालयात गेला आहे. कारण २२५,२२६ आणि २२७ मधील प्रभागात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे नातेवाईक रिंगणात आहेत .कुलाबा येथील इच्छुक उमेदवार बबन महाडीक यांच्यासह इतरांनी याचिका दाखल केली आहे.

इच्छुक उमेदारांनी दाखल केलेल्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घेण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला आहेय याचिकाकर्त्यांना नियमित सुनावणीकरता वाट पाहण्याच्या सूचना कोर्टाने दिल्या आहेत. वेळेच कारण पुढे करत तब्बल २२ जणांचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी शेवटच्या दिवशी स्वीकारले नव्हते अर्ज न स्वीकारलेल्या उमेदवारांना निवडणुकीला उभ राहण्याची अनुमती देण्याची याचिकेत मागणी करण्यात आली आहे. जनता दल आणि आम आदमी पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज वेळेच्या कारणास्तव नाकारण्यात आले होते.

## व्हॉट्सअॅपर मेसेज आला अन् बँक खाते रिकामे, सावधान! तुमच्यासोबतही असं होऊ शकते, काय कराल?

**पुणे/प्रतिनिधी :** तुमच्या वाहनावर दंड (ई-चलान) लागला आहे, तात्काळ भरा, असा मेसेज किंवा व्हॉट्सअॅप लिंक मिळाल्यानंतर अनेक नागरिक घाबरून त्यावर क्लिक करत आहेत. मात्र, ही लिंक अधिकृत नसून सायबर चोरांकडून पाठवली जात असल्याचे समोर आले आहे. पुण्यासह राज्यभरात सध्या ई-चलानच्या नावाखाली सायबर फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून, अनेकांचे बँक खाते काही मिनिटांतच साफ झाल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.

सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना व्हॉट्सअॅप किंवा एसएमएसद्वारे 'तुमच्या वाहनाचे चलान बाकी आहे', 'ई-चलान डिटेल पाहण्यासाठी अॅप डाउनलोड करा' अशा स्वरूपाचे मेसेज पाठवले जात आहेत. या मेसेजसोबत एपीके फाइल, पीडीएफ किंवा झीप फाइलची लिंक दिली जाते. संबंधित लिंकवर क्लिक करताच ती फाइल आपोआप मोबाइलमध्ये इन्स्टॉल होते.

ही फाइल अधिकृत अॅप नसून, एक प्रकारचे धोकादायक स्पायवेअर असल्याचे सायबर तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. एकदा हे अॅप मोबाइलमध्ये इन्स्टॉल झाले की, ते मोबाइलवरील ओटीपी, बँकिंग अॅप्स, पासवर्ड, मेसेजेस तसेच कॉन्टॅक्ट लिस्टवर पूर्ण नियंत्रण मिळवते. त्यानंतर सायबर चोर काही वेळातच पीडिताच्या बँक खात्यातून परस्पर पैसे काढतात. अनेकदा फसवणूक झाल्याचे लक्षात येईपर्यंत मोठे आर्थिक नुकसान झालेले असते. पोलीस आणि सायबर तज्ज्ञांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वाहतूक पोलिसांचे अधिकृत ई-चलान केवळ सरकारच्या अधिकृत वेबसाईटवर किंवा अधिकृत अॅपवरच उपलब्ध असते. अनोळखी नंबरवरून आलेले चलानचे मेसेज, लिंक किंवा फाइल्स उघडणे धोकादायक ठरू शकते.

नागरिकांनी घ्यावयाची काळजी : अनोळखी नंबरवरून आलेले चलानचे मेसेज किंवा लिंक क्लिक करू नका. एपीके, पीडीएफ किंवा झीप फाइल्स डाउनलोड अथवा ओपन करू नका. गुगल प्ले स्टोअरशिवाय कोणतेही अॅप मोबाइलमध्ये इन्स्टॉल करू नका. संशयास्पद अॅप आढळल्यास तात्काळ डिलीट करा. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्वरित १९३० या सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या काळात नागरिकांनी अधिक जागरूक राहणे गरजेचे असल्याचेही तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

# डोळ्यांदेखत बेचिराख झाली बस! समृद्धी महामार्गावर ३५ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या बसमध्ये अग्नितांडव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** समृद्धी महामार्ग आणि त्यावर धावणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स. हे समीकरण आता प्रवाशांच्या मनात धडकी भरवणारे ठरू लागले आहे. २६ जणांचा जीव घेणाऱ्या त्या भीषण अपघाताच्या आठवणी अजूनही अंगावर काटा आणतात. आज पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर भीषण दुर्घटना घडली. आगीचे भीषण तांडव पाहायला मिळाला. नागपूरहून मुंबईकडे निघालेल्या खुराणा ट्रॅव्हल्सच्या बसला मेहकर तालुक्यातील शिवनी पिसा गावाजवळ अचानक आग लागली आणि पाहता पाहता प्रवाशांच्या स्वप्नांचा प्रवास एका भयावह अग्नितांडवात बदलला.

सोमवारी रात्रीच्या सुमारास जेव्हा ३५ प्रवासी गाढ झोपेत होते, तेव्हा काळाने त्यांच्यावर झडप घालण्याचा प्रयत्न केला.



बसच्या इंजिनमधून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच आगीच्या लोळांनी संपूर्ण बसला विळखा घातला. तो काळोख, प्रवाशांच्या किंकाळ्या आणि बाहेर पडण्यासाठी चाललेली धडपड. हा सर्व थरार काळजाचा ठोका चुकवणारा होता. सुदैवाने, चालकाने दाखवलेले प्रसंगावधान आणि प्रवाशांनी मृत्यूच्या दाढेतून बाहेर पडण्यासाठी लावलेली जीवाची बाजी यामुळे ३५ जणांचे प्राण थोडक्यात बचावले.

हे प्रवासी बसच्या बाहेर पडले आणि अवघ्या काही मिनिटांत डोळ्यांदेखत ती ट्रॅव्हल्स जळून खाक झाली. प्रवाशांचे सामान, कपडे आणि त्यांच्या मेहनतीची पुंजी त्या आगीत भस्मसात झाली. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या त्या ३५ प्रवाशांच्या डोळ्यांत मृत्यूला जवळून पाहिल्याची भीती आणि सुखरूप वाचल्याचे अश्रू एकाच वेळी दाटून आले होते. 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' याची प्रचिती देणारी ही घटना पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावरील प्रवासाच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करून गेली आहे. या दुर्घटनेत काही प्रवासी किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पण, त्या रात्रीच्या आगीच्या ज्वाळा आणि जीवाचा आकांत त्या ३५ प्रवाशांच्या मनातून कधीच पुसला जाणार नाही. घरच्यांना पुन्हा भेटता येईल की नाही, या चिंतेत असलेल्या त्या प्रवाशांसाठी तो अपघात म्हणजे एक पुनर्जन्मच ठरला आहे.

## पुण्याच्या रस्त्यावर गुंडांचा हैदोस, तरुणाला किडनॅप केले, विवस्त्र करून हल्ला, गोळीबारही केला!

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याच्या रस्त्यावर पुन्हा एकदा गुंडांनी हैदोस घातला आहे. कात्रज-कोंढवा रोडवर गुंडांनी एका ३१ वर्षाच्या तरुणाचं अपहरण केलं आणि त्याला विवस्त्र करून मारहाण केली, तसंच गोळीबारही केला आहे. आर्थिक वादातून हा प्रकार झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे पोलिसांनी याप्रकरणी ९ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सर्व आरोपी हे कोंढवा परिसरातील रहिवासी आहेत. सर्व आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वाहन खरेदी-विक्री व्यवसायात सहभागी असलेला पीडित हादेखील कोंढवा भागात राहत होता आणि आरोपींच्या परिचित होता. ३१ डिसेंबर रोजी त्यांच्यात आर्थिक व्यवहारांवरून वाद झाला. या वादादरम्यान आरोपींनी पीडित तरुणावर हल्ला केला आणि त्याला जबरदस्तीने कारमधून घेऊन गेले.




# २४ तासांत राज ठाकरेंना दुसरा मोठा धक्का! मुंबई नंतर ठाण्यात मोठा राजकीय भूकंप, मनसेच्या ८ नेत्यांनी एकाचवेळी पक्ष सोडला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ऐन मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राज ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. कट्टर मनसैनिक संतोष धुरी यांनी मनसेची साथ सोडत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. २४ तासांत राज ठाकरेंना दुसरा मोठा धक्का बसला आहे. मनसे प्रवक्त्यासह आणखी ८ नेत्याने पक्ष सोडला आहे. हे आठही जण मनसे पक्षात विविध पदांवर होते. या सर्वांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे

मुंबईनंतर ठाण्यात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. मनसेला मोठा धक्का बसलाय. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस राजाभाऊ चौगुले, मनसेचे प्रवक्ते हेमंत कांबळे, मनसे चित्रपट सेनेचे सरचिटणीस राहुल तूपलोंढे, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे संदेश शेट्टी, मुनव्वर शेख, जनहित कक्षाचे देवाशीष मर्क, प्रथमेश बांदेकर, संतोष यादव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी शिंदे यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेना सरचिटणीस राहुल शेवाळे, शिवसेना सचिव सुशांत शेलार, शिवसेना प्रवक्त्या सौ. शीतल म्हात्रे आणि शिवसेनेचे सर्व स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

राज ठाकरेंना फटका

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत राज ठाकरेंना पुन्हा एकदा मोठा झटका बसला आहे. आधीच उमेदवारी न मिळाल्यामुळ नाराज अधिकाऱ्यांनी राज ठाकरेंची साथ सोडली, त्यात आता निष्ठावंत



मनसैनिक अशी ओळख असलेल्या संतोष धुरींनी सोमवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतल्यानंतर राज ठाकरेंना

जय महाराष्ट्र केला. भाजप मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या उपस्थितीत संतोष धुरींनी भाजपात प्रवेश केला. प्रभाग क्रमांक १९४ मधून उमेदवारी न मिळाल्याने संतोष धुरी नाराज होते. अमित साटम यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपमध्ये प्रवेश करताच धुरींनी ठाकरे बंधूंवर टीकेचे बाण सोडलेत. राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंसमोर पक्ष सरेंडर केल्याचा आरोप धुरी यांनी केला आहे.

## कृषिक्षेत्रातील आत्मनिर्भरतेचे यश

भारताने तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकत जगात पहिला क्रमांक मिळविण्याचा भीमपराक्रम केला आहे. भारताचे हे यश कृषिक्षेत्रापुरतेच मर्यादित नाही, तर हा स्वातंत्र्योत्तर विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारत आज अन्नपुरवठ्यात निर्णायक भूमिका बजावतो आहे, हेही उल्लेखनीय असेच यश. भारताने तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकत जगातील पहिला क्रमांक मिळवला, ही बातमी कृषिक्षेत्रापुरती मर्यादित नाही; तर हा भारताच्या स्वातंत्र्योत्तर विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. अन्नसुरक्षेच्या प्रश्नावरून आयातीवर अवलंबून असलेल्या देशाने आज जागतिक अन्नपुरवठ्यात निर्णायक भूमिका मिळवणे, हे दीर्घकालीन धोरणात्मक परिवर्तनाचे द्योतक आहे. या यशामागे शेतकऱ्यांचे श्रम आहेतच; पण त्याहून अधिक महत्त्वाची आहे ती धोरणांची सातत्यपूर्ण दिशा, संशोधनाची भक्कम बैठक आणि कृषी क्षेत्राकडे पाहण्याची बदललेली दृष्टी. स्वातंत्र्यानंतर भारताची शेती ही उपजीविकेपुरती मर्यादित होती. लोकसंख्या वाढत होती, उत्पादन मात्र अनिश्चित होते. दुष्काळ, अपुरा पाऊस, सिंचनाचा अभाव, साठवणुकीची कमतरता आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे अन्नसुरक्षा ही कायमची चिंतेची बाब राहिली. तांदूळ हा मुख्य अन्नघटक असूनही, त्याचे उत्पादन मात्र हवामानावरच अवलंबून होते. आयात हा पर्याय अपरिहार्य असाच होता. या पार्श्वभूमीवर हरितक्रांतीने उत्पादनात वाढ केली असली, तरी त्याचे फायदे काही प्रदेशांपुरतेच मर्यादित राहिले. पाण्याचा अतिवापर, जमिनीची झीज आणि खर्चीक शेती ही त्याची दुसरी बाजू होती. काँग्रेसच्या दीर्घकालीन सत्तेत शेती धोरणांचा भर प्रामुख्याने तत्कालिक उपायांवरच राहिला. उत्पादन वाढवण्यापेक्षा अनुदाने, कर्जमाफी आणि भावनिक राजकारण यांनाच अधिक महत्त्व लाभले. संशोधन संस्थांचा विस्तार झाला; पण त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा वेग कमी होता. बियाणे, सिंचन, साठवणूक, प्रक्रिया आणि निर्यात यांची साखळी एकत्रितपणे उभी राहिली नाही. परिणामी, तांदूळ उत्पादन वाढत असले; तरी त्याची गुणवत्ता, शाश्वतता आणि जागतिक स्पर्धात्मकता याबाबत मर्यादा कायम राहिल्या. २०१४नंतर शेतीकडे पाहण्याची दिशा बदलली. शेती ही सामाजिक कल्याणाची बाब नाही, तर ती राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे ही भूमिका प्राधान्याने स्वीकारली गेली. उत्पादन वाढवताना शाश्वतता, संशोधन आणि बाजारपेठ यांचा समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. तांदूळ उत्पादनात हा बदल ठळकपणे दिसून आला. नवीन वाणांचे संशोधन, रोगप्रतिबंधक आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या जाती, हवामानबदलाला तोंड देणारी बी-बियाणी ही प्रक्रिया वेगाने पुढे गेली. प्रयोगशाळेतील संशोधन थेट शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला गेला. यासोबतच सिंचनाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली. पाण्याचा कार्यक्षम वापर, सूक्ष्म सिंचन, पाणलोट क्षेत्र विकास, यामुळे उत्पादन स्थिर राहू लागले. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव, बियाणे आणि सरकारी योजनांची माहिती वेळेवर मिळू लागली. किमान आधारभूत किंमत व्यवस्थेत पारदर्शकता वाढली. सरकारी खरेदी यंत्रणा अधिक सक्षम झाल्याने शेतकऱ्यांचा विश्वास वाढला, उत्पादन वाढले; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे उत्पादनाचा धोकाही कमी झाला. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे तांदूळ उत्पादनात सातत्याने झालेली वाढ. चीनसारख्या देशाची मक्तेदारी मोडीत काढणे हे सहजसाध्य नव्हते. चीनकडे विशाल सिंचन व्यवस्था, यांत्रिकीकरण आणि केंद्रीकृत नियोजन आहे. भारताने मात्र हवामानातील वैविध्यता, लहान शेतजमिनी आणि लाखो शेतकऱ्यांच्या सहभागातूनच हे यश मिळवले. हीच भारतीय शेतीची ताकद आहे. उत्पादनाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर येणे म्हणजे ते व्यवस्थापनाची परिपक्वता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. या स्वयंपूर्णतेचे महत्त्व जागतिकसंदर्भात अधिक ठळक होते. अन्नधान्याचा पुरवठा हा आज आर्थिक नव्हे, तर सामरिक प्रश्न बनला आहे. अनेक देश आयातीवर अवलंबून आहेत. अशा वेळी भारताचा विश्वसनीय पुरवठादार म्हणून उदय होणे, ही परराष्ट्र धोरणालाही बळ देणारी बाब आहे. तांदूळ निर्यातीत भारताने मिळवलेले स्थान हे या आत्मनिर्भरतेचे प्रत्यक्ष फलित आहे. देशांतर्गत गरजा पूर्ण करून निर्यात वाढवण्याचे संतुलन साधणे सोपे नसते, मात्र ते भारताने साध्य केले. तथापि, या यशाकडे आत्मसंतोषाने पाहून चालणार नाही. उत्पादन वाढले असले; तरी शेतकऱ्यांचे उत्पन्न, प्रक्रिया उद्योगांचा विस्तार, साठवणूक व्यवस्था आणि मूल्यवर्धन यांवर अधिक काम करण्याची गरज आहे. हवामानबदलाचे आव्हान अधिक तीव्र होत असून, पाण्याची उपलब्धताही मर्यादित आहे. त्यामुळे भविष्यातील धोरणे अधिक सूक्ष्म आणि दीर्घकालीन दृष्टीने आखावी लागतील. तांदूळ उत्पादनातील यश हे इतर पिकांमध्येही कसे रूपांतरित करता येईल, हा पुढचा प्रश्न आहेच. तरीही, एक गोष्ट निर्विवाद आहे आणि ती म्हणजे भारताने तांदूळ उत्पादनात जगात अव्वल स्थान मिळवणे, ही अपघाती घटना नाही. स्वातंत्र्यानंतरच्या अपूर्णतेपासून ते आजच्या आत्मनिर्भरतेपर्यंतचा हा प्रवास सांगतो की, शेतीकडे योग्य दृष्टीने पाहिले तर ती देशाला अन्नच नाही, तर आत्मविश्वासही देते. चीनला मागे टाकण्याचा हा क्षण भारतासाठी आकड्यांचा नव्हे, तर आत्मभानाचा आहे. आज भारत अन्नाच्या बाबतीत जगाला पुरवठा करणारा देश झाला आहे. हेच या यशाचे खरे मोजदाद म्हणता येईल.

# गडकरी मंचावर असताना बांगलादेशला भारतात विलीन करण्याची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**



**नागपूर/प्रतिनिधी :** भारत आणि बांगलादेश संबध विविध कारणांमुळे सध्या ताणलेले आहेत. भारत-बांगलादेश क्रिकेट संबंध सध्या एका नव्या वादामुळे चर्चेत आले आहे. आगामी टी२० विश्वचषक २०२६ भारतात होणार असताना बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) भारतात सामने खेळण्याबाबत सुरक्षा कारणे पुढे करत चिंता व्यक्त केली आहे. बांगलादेशी खेळाडू आणि अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत काही सामने तटस्थ ठिकाणी किंवा इतर देशात खेळवण्याची म ागणी केल्याचे वृत्त आहे. यामुळे भारतीय क्रिकेट वर्तुळात नाराजी व्यक्त होत असून बीसीसीआयकडून ही बाब अतिशयोक्त आणि अनावश्यक असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, राजकीय आणि क्रिकेटीय चर्चेतून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर बांगलादेशचा भारतात, विशेषत: सोशल मीडिया आणि काही क्रीडाप्रेमी गटांमध्ये, विरोध होताना दिसत आहे. भारतात होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ संदर्भात बांगलादेश क्रिकेट मंडळाने सुरक्षा कारणे पुढे करत शंका उपस्थित केल्यानंतर भारतीय चाहत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. ''भारत सुरक्षित नाही'' असा अप्रत्यक्ष संदेश देण्यात आल्याचा आरोप करत अनेकांनी हा मुद्दा अनावश्यक व राजकीय रंग देणारा असल्याचे म्हटले आहे.

काही माजी खेळाडू आणि विषकांनीही बांगलादेशची भूमिका आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या आत्म्याला धरून नसल्याची टीका केली आहे. या विरोधाचे पडसाद सोशल मीडियावर अधिक तीव्र दिसत असून, भारताने आतापर्यंत बांगलादेश संघाचे यजमान म्हणून सुरळीत आयोजन केले असताना अशा शंका उपस्थित करणे अयोग्य असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. त्यामुळे, हा वाद केवळ क्रीडापुरता मर्यादित न राहता भारत-बांगलादेश संबंधांतील संवेदनशीलतेचे प्रतिबिंब म्हणूनही पाहिला जात आहे. अशा परिस्थितीत बांगलादेशला भारतात विलीन करण्याबाबतही चर्चेला उधाण आले आहे. मोदी सरकारमध्ये महत्वपूर्ण स्थानी असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे नागपूरमध्ये एका कार्यक्रम ात असताना बांगलादेशला भारतात विलीन करण्याबाबत मागणी करण्यात आली.

नेमकी मागणी काय?

नागपूरमध्ये एका शैक्षणिक संस्थेच्या शताब्दी महोत्सवात गडकरी उपस्थित होते. कार्यक्रमात श्रीराम जन्मभूमी न्यासचे कोषाध्यक्ष व आध्यात्मिक गुरु गोविंद देव गिरी महाराज देखील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गोविंद गिरी देव म हाराज यांनी यावेळी बांगलादेशचा उल्लेख केला आणि म्हणाले, 'राममंदिर निर्माण हा भविष्यात करावयाच्या विविध कार्याचा शुभारंभ आहे. आपल्याला आता रामराज्य निर्माण व राष्ट्रनिर्माणाचे कार्य करायचे आहे. याशिवाय, बांगलादेश व पाकिस्तानम धील काश्मीरला म्हणजेच पीओके भारतामध्ये विलीन करण्ये आमचे स्वप्न आहे. भारत असाच पुरुषार्थ गाजवत राहिल्यास हे स्वप्न लवकरच पूर्ण होईल.' गोविंद गिरी देव महाराज यांच्या भाषणानंतर गडकरी यांनी भाषण केले, मात्र बांगलादेशच्या विषयावर त्यांनी काहीही भाष्य केले नाही.

# ठाण्यात भाजपचा निर्धारनामा प्रकाशित; 'अब की बार सो पार'चा भाजपला विश्वास

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने निर्धारनामा प्रकाशित केला. 'विकासाला गती, पर्याय एकच; भाजप - महायुती' असे सांगत निर्धारनामा प्रकाशित करण्यात आला. याप्रसंगी भाजप शिवसेना युती 'अब की बार सो पार' जाणार महापालिकेतील किमान १०० जागा नक्की जिंकणार असा विश्वास भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी व्यक्त केला. निर्धारनामा प्रकाशनप्रसंगी माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, शिवसेना प्रदेश सचिव राम रेपाळे, प्रदेश प्रवक्ते सुजय पत्की, भाजपचे जिल्हा अध्यक्ष संदीप लेले, प्रवक्ता सागर भदे उपस्थित होते. प्रकाशन सोहळा ठाणे भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झाला.

भाजप - शिवसेना महायुतीविषयी जनतेच्या मनात विश्वास आहे. या विश्वासामुळेच महायुती किमान १०० जागा नक्की जिंकणार असा विश्वास भाजपचे म ाजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केला. तर निर्धारनामा म्हणजे एक प्रकारे ठाण्याच्या सर्वांगीण विकासाची रुपरेखा असल्याचे आमदार संजय केळकर म्हणाले. ठाणे शिक्षण आणि रोजगाराच्या अफाट संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी नियोजन करणार असल्याचेही आमदार संजय केळकर म्हणाले.

भाजप- शिवसेना महायुतीने ठाणे शहरासाठी ५४ कलमी 'निर्धारनामा' जाहीर केला आहे. ज्यात शहरात मिनी क्लस्टर योजना राबविण्यासह ठाणेकरांसाठी २४ तास पाणी पुरवठा, नवीन गृहसंकुलांसाठी पाण्याच्या पुनर्वापराचे धोरण जाहीर केले आहे. तसेच, दर तीन महिन्यांनी प्रभागसभा घेऊन प्रभागनिहाय खर्चाचा डिजिटल बोर्ड लावला जाईल. स्वच्छ, हरित व पर्यावरणपूरक ठाणे साकारण्यासाठी सीएसआरच्या माध्यमातुन तलावांचे सुशोभीकरण व पर्यटन सुविधा विकसित केल्या जातील. कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्या बरोबरच शहरात भूमीगत कचरा कुंड्या बसवण्यात येतील.त्याचप्रमाणे दुबार नालेसफाईसह मलनि:स्सारण ऑडिट व कृती आराखडा केला जाईल. शहरासाठी कॅन्सर हॉस्पिटल, एम्सच्या धर्तीवर भव्य रुग्णालय, महिलांसाठी नियमित आरोग्य तपासणी व्हॅन्स, ठाणे ही सांस्कृतिक राजधानी असल्याने सहा ते आठ भव्य पार्कस, नाट्यगृहे, फिल्म फेस्टिव्हल, स्ट्रीट आर्ट, संगीत महोत्सव, डिजिटल ग्रंथालये आदीसह नवीन स्टेडियम उभारून आयपीएल व आंतरराष्ट्रीय स्पर्धाचे आयोजन केले जाईल. कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख डिजिटल शिक्षणाबरोबरच महापालिका शाळांमध्ये अर्ध-इंग्रजी पद्धती, सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षम ीकरणासह टीएमटी सेवेचा दीर्घकालीन कृती आराखडा तयार करण्यात येणार असुन प्रत्येक मेट्रो स्टेशनपासून परिसरात जाण्यासाठी मिनी बसचे नेटवर्क उपलब्ध केले जाईल. आधुनिक पार्किंग स्टेशन आणि ठाणे शहरात इंटर्नल रिंग मेट्रो बनविण्याचा निर्धार महायुतीने व्यक्त केला आहे. ठाणेकरांना उत्तम पायाभूत सुविधा देण्याकरीता शहरातील १९७ कि.मी. रस्त्यांचे सखोल ऑडिट करून,१० वर्षे टिकतील असे कॉंक्रीटीकरण पूर्ण करण्यात येणार आहे. पादचाऱ्यांना प्राधान्य असणारे महापालिकेचे स्वतंत्र पदपथ धोरण तसेच फेरीवाला धोरण लागू करणार असुन जुन्या इमारतींच्या पुनर्विकास मंजुरीसाठी एक खिडकी योजनाही राबवण्यात येणार असल्याचा निर्धार महायुतीने व्यक्त केला आहे.

## खबरदार ! लग्न केले तर अग्निवीरसाठी आता नवे मापदंड; कायम व्हायचे तर

**वर्धा/प्रतिनिधी :** भारतीय सैन्य दलाची अग्निवीर योजना चांगलीच गाजली. संसदेत त्यावर प्रश्नांचा भडीमार पण झाला होता. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी व संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी ती योजना रेटून धरत अंमलात आणली आहे. अग्निवीर योजना २०२२ मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेत भरती झालेली पहिली तुकडी आता सेवेस चार वर्ष पूर्ण करीत आहे.

अग्निवीर तरुणांच्या २०२२ मधील तुकडीतील सेवा कालावधी जून व जुलैच्या २०२६ मध्ये संपणार. एका अंदाजानुसार पहिल्या तुकडीतील २० हजार अग्निवीर आता निवृत्त होणार आहे. या योजनेत भरती होणाऱ्या असंख्य युवकांचे स्वप्न असते. चार वर्षाच्या सेवेनंतर भारताच्या सैन्य दलात नेहमीसाठी सैनिक बनून देश सेवा करायची.

मात्र आता एक बदल झाला आहे. भारतीय सैन्य दलाने एक महत्वाचा नियम लागू केला आहे. चार वर्षाच्या सेवेअंती सैन्यात कायम होण्याची सर्वाची इच्छा असते. ती इच्छा ठेवून असणाऱ्या अग्निवीर यांना कायम नियुक्ती मिळेपर्यंत लग्न करता येणार नाही. जर एखाद्या अग्निविराने सैनिक म्हणून कायम होण्यापूर्वी लग्न केले तर त्यांना कायमस्वरुपी सेवेसाठी अपात्र ठरविल्या जाणार. असे अग्निवीर हे कायम नियुक्तीसाठी अर्ज करू शकणार नाहीत. तसेच निवड प्रक्रियेत सहभागी होवू शकणार नाही. ही आता महत्वाची अट ठरली आहे.

अग्निवीर हे सैन्यात कायम झाल्यानंतरच लग्न करू शकतात, असे मार्गदर्शक तत्वात स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणजेच कायम नियुक्तीचे निकाल लागेपर्यंत त्यांना लग्न करण्यापासून दूर रहावे लागणार. त्याची वेळ निश्चित झाली आहे. चार वर्षाची सेवा पूर्ण झाली की अग्निविरांना सर्व सोपस्कार पूर्ण करण्यासाठी चार ते सहा महिने प्रतिक्षा करावी लागणार आहे. लागू झालेला नवा नियम खरे तर सैन्यात दाखल प्रत्येक अग्निवीर याने समजून घेणे आवश्यक ठरते. कारण हा बदल त्यांच्या व्यक्तिगत जीवनास बाधित करणारा ठरेल. लग्नाबद्दल स्पष्ट म ार्गदर्शन तत्वे यातून स्पष्ट होत आहे. हा निर्णय अंमलात येत असल्याने कार्यरत अग्निवीर यांच्यापुढे अनेक प्रश्न आ वाचून उभे राहतील. लग्न कधी करावे, असे हे निर्दे श आहेत.

## ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या आईने केले विष प्राशन, काँग्रेसवर दबाव टाकण्याचा आरोप, सांगलीत वातावरण तापले

**सांगली/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडाला आहे. पण या निवडणुकीला हल्ले, खून आणि मारामारीच्या घटनांनी गालबोट लागले आहे. आता सांगली महापालिका निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट उमेदवाराच्या आईने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. काँग्रेसकडून दबाव टाकण्यात आल्याचा ठाकरे गटाचा आरोप आहे. पण, हा आरोप काँग्रेसने फेटाळला आहे. सांगली महापालिका निवडणुकीमध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या आईने विष प्राशन करत आत्महत्या केल्याचा प्रकार घडला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीकडून उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव टाकल्याने हा प्रकार घडल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला आहे. सांगलीच्या प्रभाग १६ मधून शिवसेना ठाकरे पक्षाकडून उमर गवंडी हे निवडणूक लढवत आहेत तर त्यांच्या विरोधात काँग्रेस राष्ट्रवादी आघाडीचे राजेश नाईक हे निवडणूक लढवत आहे. या निवडणुकीतून माघारीसाठी उमर गवंडी यांच्यावर दबाव टाकण्यात येत असल्याने त्यांच्या आई मुमताज गवंडी यांनी विष प्राशन केल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.

# जळगाव पुढील पाच वर्षात विकसित शहरांच्या श्रेणीत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**



**जळगाव/प्रतिनिधी :** म हापालिकेला शासनाकडून काही वर्षापूर्वी ५० कोटीही मिळत नव्हते. मात्र, आता जळगावात हजारो कोटी रुपयांचे विकास प्रकल्प सुरू असून, शहराचा चेहरामोहरा बदलत आहे. जळगावकरांच्या आशीर्वादाने आगामी महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा महायुतीची सत्ता येईल आणि महापौरही महायुतीचाच असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी जळगाव शहरात महायुतीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भव्य रोड शो आयोजित करण्यात आला. त्याआधी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत जळगाव शहराच्या विकासाचा आराखडा सादर केला. राज्य सरकारच्या निधीतून गेल्या पाच वर्षात जळगाव शहरात रस्ते, पायाभूत सुविधा आणि विविध विकासकाम ांसाठी शेकडो कोटी रुपयांची कामे करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आगामी काळात विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात उद्याने, पाणी पुरवठा व्यवस्था, अंतर्गत व प्रमुख रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येईल. याशिवाय जळगाव परिसरात उद्योग आणण्यावरही भर देण्यात येणार आहे. जळगावला राज्य सरकारने आधीच विशेष दर्जा दिला असून, त्यामुळे उद्योगांना पोषक वातावरण निर्माण होईल आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

विशेष बाब म्हणजे जळगाव महापालिकेवरील संपूर्ण कर्ज राज्य सरकारने यापूर्वीच फेडले असून, असे उदाहरण संपूर्ण राज्यात यापूर्वी कधीही घडले नव्हते. जळगावला पुढील पाच वर्षात विकसित शहरांच्या श्रेणीत आणण्याचा संकल्प महायुतीने केला असून, त्यासाठी लागणारा सर्व निधी राज्य सरकार देईल, अशी घोषणा देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना केली. दरम्यान, रोड शोमध्ये महायुतीचे जोरदार शक्तीप्रदर्शन पाहायला मि ळाले. भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच रिपाई यांच्या वतीने आयोजित या रोड शोमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील मंत्री, खासदार, आमदार आणि महायुतीच्या घटक पक्षांचे प्रमुख पदाधिकारी खास सजविलेल्या वाहनावर सहभागी झाले होते.

रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी करत मुख्यमंत्री व महायुतीच्या नेत्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी भाजपचे नेते व मंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महायुतीच्या या रोड शोमुळे जळगाव शहरात निवडणुकीचे वातावरण तापले असून, महापालिका निवडणुकीत विकासाच्या मुद्द्यावर म हायुती जोरदार प्रचार करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## इराणमधील तणावपूर्ण स्थिती; भारताने जारी केली ट्रॅव्हल ॲडव्हायजरी

नवी दिल्ली : इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या संघर्षामुळे परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने सध्या इराणमध्ये असलेल्या आणि तिकडे प्रवासास जाण्याचा विचार करणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी अधिकृत प्रवास मार्गदर्शक सूचना (ट्रॅव्हल ॲडव्हायजरी) जारी केल्या आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील सद्यस्थिती पाहता भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत इराणचा कोणताही बिगर-जरुरी प्रवास टाळावा. जे भारतीय नागरिक कामानिमित्त किंवा शिक्षणासाठी सध्या इराणमध्ये वास्तव्य करत आहेत, त्यांनी अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः ज्या भागात हिंसक आंदोलने किंवा मोठी गर्दी जमली आहे, अशा ठिकाणांपासून भारतीयांनी लांब राहावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

भारत सरकारने इराणमधील भारतीयांना स्थानिक बातम्या आणि घडामोडींवर सतत लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. तसेच, तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या अधिकृत वेबसाइट आणि सोशल मीडिया खात्यांच्या संपर्कात राहून वेळोवेळी जारी होणाऱ्या सूचनांचे पालन करण्यास सांगण्यात आले आहे. जे भारतीय नागरिक निवासी व्हिसावर तिथे राहत आहेत आणि ज्यांनी अद्याप दूतावासाकडे आपली नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने आपली माहिती नोंदवावी, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवणे सोपे होईल. इराणमध्ये गेल्या आठवडाभरात सरकारविरोधी आंदोलन सुरु असून, आंदोलक आणि सुरक्षा दलांमधील चकमकी वाढल्या आहेत. या अनिश्चिततेच्या वातावरणामुळे भारतीय नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# विलासराव देशमुख यांच्याबद्दलच्या विधानासाठी माफी मागतो

## टीका होताच रवींद्र चव्हाण यांचे घूमजाव

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वादग्रस्त विधान केल्याचा आरोप काँग्रेसनं केलाय. त्यावरुन राजकीय वातावरण तापलं आहे. या विधानावरुन चव्हाण यांनी घुमजाव करत देशमुख कुटुंबीयांची दिलगिरी व्यक्त केली. काँग्रेसनं देखील भाजपावर जोरदार हल्लाबोल केलाय.



रवींद्र चव्हाण यांचं घुमजाव - ''मी दिवंगत विलासराव देशमुख यांच्यावर जराही टीका-टिप्पणी केली नाही. विलासराव देशमुख मोठे नेते होते. त्यामुळं त्यांना फोकस करून काँग्रेस तिथं मत मागत आहे. त्या संदर्भात मी विधान केलं होतं. तरी त्यांचे चिरंजीव व कुटुंब यांचं मन दुखावलं असेल तर दिलगिरी व्यक्त करतो,'' असं म्हणत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी माफी मागितली. तसंच त्यांनी आपल्या वक्तव्यावरून घुमजाव केला.

''निवडणुका या कशासाठी असतात तर त्या नागरी सुविधा कोणता पक्ष गतिमान देईल यासाठी असतात. सर्व नागरी सुविधा लातुरात व्हायला हव्यात,'' असं म्हणत रवींद्र चव्हाण यांनी अधिक बोलणं टाळलं. तर त्यांनी विलासराव देशमुख यांच्याबाबत केलेल्या विधानावर दिलगिरी व्यक्त केली.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर देशमुख कुटुंबीयांनी कडाडून टीका केली. दिवंगत विलासराव देशमुख यांचे पुत्र रितेश देशमुख यांनी सोशल मीडियावर लिहिलंय की, ''लोकांसाठी जगणाऱ्या माणसांची नावं मनावर कोरलेली असतात. लिहिलेलं पुसता येतं, कोरलेलं नाही.'' अशा भाषेत त्यांनी टीका केली. तर आमदार अमित देशमुख यांनी देखील टीका करत ''राजकारण कुठल्या थराला चाललंय हा प्रश्न पडलाय. दुर्दैवी आहे की, त्यांनी असं विधान करायला नको होतं. लातूर किंवा महाराष्ट्राची ही संस्कृती नाही. सर्व स्तरातून निषेध होतोय,'' असं म्हटलंय.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यानंतर लगेच टीका करून उत्तर दिलं. ''दिवंगत विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूर जिल्ह्यातून पुसू शकणारा अजून कोणी निर्माण झाला नाही. अनेकजण इच्छा बाळगून आलेत. मात्र, स्वाभिमानी लातूरकरांना त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली. त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य लातूरच्या विकासासाठी समर्पित केलं. सत्तेचा माज असलेले भाजपा नेते लातूर येथे येऊन बरळून जातात की, साहेबांच्या आठवणी पुसल्या गेल्या. विलासराव देशमुख यांचं लातूरशी असलेलं नातं भाजपाला कधीच कळणार नाही. लातूरच्या कर्तृत्व संपन्न सुपुत्राचा अवमान लातूरकर कधीच सहन करणार नाही, भाजपावाल्यांनो याद राखा, करारा जवाब मिलेगा,'' अशी टीका सपकाळ यांनी भाजपावर केली.



विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसणं शक्य नाही : नाना पटोले - या प्रकरणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनीही निषेध व्यक्त केला. ''विलासराव देशमुख यांच्या आठवणी केवळ लातूरमधूनच नव्हे तर महाराष्ट्राच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातून पुसल्या जाऊ शकत नाहीत. विलासराव देशमुख यांच्यासारखं दिलखुलास व्यक्तिमत्व राज्याच्या राजकारणात होतं, ही महाराष्ट्राला अभिमान वाटावा, अशी गोष्ट आहे. त्यांच्याबद्दल बोलताना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेलं विधान हे अत्यंत दुर्दैवी आणि त्यांची मानसिकता दाखवणारं आहे. रवींद्र चव्हाणच काय कुणालाही विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसणं शक्य नाही. आपल्या संस्कृतीत दिवंगत व्यक्तींच्या स्मृती जपल्या जातात. मात्र संस्कृतीच माहिती नसणाऱ्या लोकांची विकृत मानसिकता हे समजू शकत नाही. विलासराव देशमुख यांच्याबद्दल रवींद्र चव्हाण जे बोलले ते हा महाराष्ट्र कदापि विसरणार नाही आणि येणाऱ्या काळात त्यांना मतपेटीतून चोख प्रत्युत्तर दिल्याशिवाय राहणार नाही,'' असं म्हणत नाना पटोले यांनी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला.

# पिंपरीत ४० हजार कोटींची कामे कुठे केली? पैसा कुठे गेला? याचा जाब विचारायला नको? अजितदादांचा भाजपवर प्रहार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या पाच वर्षात पिंपरीची अवस्था काय करून ठेवलीय हे जनतेसमोर आहे. पिंपरीतील भाजपचे स्थानिक नेते ४० हजार कोटींचा विकास केल्याचं सांगत आहेत, पण त्याचं कामं कुठे केली? तो पैसा कुठे गेला? याचा जाब विचारायला नको का? असा प्रश्न अजित पवार यांनी विचारला. त्यांच्या पक्षाचे वरिष्ठ नेते इतर कामात व्यस्त असतील, पण मी पालकमंत्री आहे, माझं लक्ष असणार असा इशाराही त्यांनी दिला. अजित पवार पिंपरीमध्ये प्रचार सभेत बोलत होते.

अनेक जण आले गेले, मला काही फरक पडत नाही. जो पर्यंत माझ्या मागे माय-माऊली असेल तोपर्यंत मी कोणाच्या बापालाही घाबरत नाही असं अजित पवार म्हणाले. काकांच्या पुण्याईनं माझं लय बरं चाललंय, गळ्या शपथ सांगतो, अशी मिश्कील टिप्पणी अजित पवारांनी केली.

मी पिंपरी चिंचवडचा विकास केला, पण कधी कर्ज काढलं नाही. आता पालिका कर्जबाजारी झाली आहे. यांनी ४० हजार कोटींची कामं कुठे केली आणि त्याचा पैसा कुठे खर्च झाला याची माहिती लोकांना द्यावी असं अजित पवार म्हणाले.



शहरात कुणाची दादागिरी चालतेय?

मी महेश लांडगे यांना स्थायी समितीचा अध्यक्ष केला. यातून त्याने जे करायचं ते केलं. मग विधानसभेला आपल्याच विलास लांडे यांच्या विरोधात बंडखोरी केली. त्यानंतर शहरात काय-काय होतंय, हे तुम्ही पाहताय. आज दादागिरी कोणाची चालली? भ्रष्टाचार कोण करतंय? त्यांच्या पक्षाचे वरिष्ठ इतर कामात बिझी आहेत, त्यामुळं त्यांचं याकडे लक्ष नसेलही. पण मी पालकमंत्री आहे. आपण लक्ष ठेऊन आहोत.

अजित पवार म्हणाले की, ''संक्रातीच्या आदल्या दिवशी प्रचार थांबतोय. मग तीळ गूळ घ्या, गोड गोड बोला. मग भोगीला मतदान आहे. आता अनेक प्रलोभनं दाखवले जातील. भूल थापांना बळी पडू नका. कोण काय करत असेल तर, कोणाला जास्त झालं असेल तर त्यांच्याकडून घ्या, काय सोडू नका. पण मी काय घ्या, हे म्हणालो नाही. तुमच्या बुद्धीला स्मरून काय करायचं ते करा, पण घड्याळाचे बटन दाबा.''

आमच्यासोबत राहायचं असेल तर सावरकरांचे विचार स्वीकारावे लागतील असं भाजप नेते आशिष शेलार म्हणाले होते. त्यावरही अजित पवारांनी भाष्य केलं. शिव-शाहू फुलेंची विचारधारा घेऊन पुढं निघालोय, मी त्यांच्या पुढं नतमस्तक आहे असं अजित पवार म्हणाले.

पिंपरीत भाजप-राष्ट्रवादी आमने-सामने

राज्यात सत्तेत एकत्र असलेले हे दोन पक्ष आगामी महानगर पालिकेत मात्र एकमेकांच्या विरोधात निवडणुका लढवत आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकांवरुन या दोघांमध्ये सध्या जोरदार कलगीतुरा रंगलाय. पिंपरी-चिंचवड आणि पुणे महापालिकेत अजित पवारांची राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा थेट सामना रंगतोय. त्यामुळे आरोपांना चांगलीच धार आल्याचे दिसतेय.

भाजपच्या कार्यकाळात पिंपरी-चिंचवड महापालिका कर्जबाजारी झाली, तसंच शहरात लुटारुंची टोळी दिवसाढवळ्या वावरतीय अशा विखारी शब्दात अजित पवारांनी भाजपला थेट लक्ष्य केले होते. तर याच पत्रकार परिषदेमध्ये अजित पवारांनी शरद पवारांचे कौतुक करताना पवारांनी विकासकामे केल्याची पुष्टीही जोडली होती.

अजित पवारांनी भाजपचा भ्रष्टाचारी असा उल्लेख केल्याने संतापलेल्या भाजपने त्यांच्यावर तोफ डागली. अजित पवारांना सोबत घेताना आपण फडणवीसांना आधीच सावध केले होते अशा शब्दात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांनी तोंडसुख घेतलेय.

## बंदुकीचा धाक, पैशाचा वापर ते निववडणूक आयोगाचे दुर्लक्ष, संसदेत आवाज उठवणार

### बिनविरोध निवडणुकांवरुन सुप्रिया सुळेंचा हल्लाबोल


**मुंबई/प्रतिनिधी :** महानगर पालिका निवडणुकीमध्ये भाजपसह, शिंदे गट आणि मागून अजित पवार गटाची बिनविरोध उमेदवार निवडून आणण्यासाठी स्पर्धाच लागली आहे. मात्र ही स्पर्धा अघोरी पद्धतीचा असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. याच मुद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जे काही घडत आहे, ते माझ्यासह राज्यातील जनतेच्या मनाला अस्वस्थ करणारे असल्याचे सुळे म्हणाल्या. छजढअ चा पर्याय उपलब्ध असूनही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात आहे असल्याचे सुळे म्हणाल्या.

नेमके काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?

तब्बल ७ ते ८ वर्षानंतर निवडणुका होत आहेत. तरीसुद्धा मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडणुका होत आहेत. न्ध्ऊअ चा पर्याय उपलब्ध असूनही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या. यामध्ये धमकीचे प्रकार, बंदुकीच्या जोरावर दहशत, पैशांचा अतोनात वापर, उमेदवारी अर्ज माघारीसाठी विविध प्रकारचा दबाव, ब्लॅकमेलिंग, बोगस मतदान आणि मतदारांना दिली जाणारी प्रलोभने असे अनेक गंभीर प्रकार माध्यमांतून सातत्याने समोर येत असल्याचे सुळे म्हणाल्या. हे सर्व घडत असताना निवडणूक आयोगाचे दुर्लक्ष अधिकच चिंताजनक आहे. सुदृढ लोकशाहीसाठी हे अतिशय धोकादायक आहे. मी याबाबत यापूर्वीही संसदेत आवाज उठवला आहे, आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी पुढेही हे मुद्दे सातत्याने मांडत राहावे लागणार आहेत असे सुळे म्हणाल्या.

मनपा निवडणुकीमध्ये चांदा ते बांदा भाजप, शिंदे गट आणि मागून अजित पवार गटाची बिनविरोध उमेदवार निवडून आणण्यासाठी स्पर्धाच लागली. मात्र ही स्पर्धा अघोरी पद्धतीचा असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. इतकेच नव्हे तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा धमकी देणारा व्हिडिओ सुद्धा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडियामध्ये व्हायरल केला. यामध्ये ते माजी खासदार हरिभाऊ राठोड यांना थेट सुरक्षा काढून टाकण्यासाठी धमकी देत असल्याचे दिसून आले. दुसरीकडे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाकडूनही उमेदवारांना धमकावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. भाजप आणि शिंदे गटाच्या शिवसेनेचे उमेदवार महाराष्ट्रातील ६९ पैकी ६८ जागांवरती बिनविरोध निवडून आले आहेत ही अत्यंत गंभीर बाब आहे.

## शब्दकोडे क्र. 56



आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '--- --- ज्योती' ६. निर्णय ९. समुद्रकिनारा १२. हिंदीत पशू १४. डुक्कर १५. गायीचे पिल्लू १६. मुरुमाची जमीन १८. रमापती २०. खराब झालेला आंबा २१. व्यक्ती, मनुष्य २३. अनुयायी, पायदळातील शिपाई २५. स्वामी २६. समुद्र २७. जास्तीत जास्त व कमीत कमी २९. चालविणारा अवयव ३०. दारूचा एक प्रकार ३२. मलई ३३. दिवस ३४. मध ३६. सर्वस्व ३७. गाय ३८. खाली मान घातलेला ४०. रत्न ४२. श्रीविष्णुचे बटुरूप ४६. होडी ४७. आई ४८. वरपांगी, दिखाऊ ४९. मीठाची चव ५०. तीव्र ऊन ५२. भूतकाळ ५४. वाळवंट ५५. लक्ष्मीचे एक नाव ५७. नूतन ६०. षष्ठीची देवता ६२. वृक्ष ६३. वर्ष, साल ६५. अखेर ६७. उद्यानंतरचा दिवस ६९. वचक ७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका ७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन ७४. वाईट, नासके ७६. मकर ७७. नवा जोम, चपळता ८०. हात ८१. माळेत हे ओवतात ८२. माती नसलेली जमीन

उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा २. अंत:करण ३. गोव्यातील शिवशंभो ४. सोन्याचा वस्त्रातील धागा ५. शहर ६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया ७. तुरूंग ८. लाट, हुक्की १०. एक शेंगभाजी ११. आवड, रूची १२. तारूण्य १६. ठेकेदार १७. आईचा भाऊ १९. नवरदेवाची आई २२. संतोष, आनंद २४. गुणज्ञ २५. चित्रपटाचा हिरो २८. शेतकरी २९. गरीब, क्षुल्लक ३०. दात ३१. जन्म-मृत्यू ३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण ३५. रंगवलेले ३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय ४०. प्रजा ४१. खास, विशेष हकीगत ४२. शेतजमीन ४३. गोदाम ४४. पदार्थ शिजतानाचा आवाज ४७. पत्ता ५१. रड्या माणूस ५३. कर्ण ५६. खवा ५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप ५९. गाडीचे छत ६०. प्रश्न ६१. मुस्लिमांचा एक सण ६४. नट्टापट्टा ६६. बंगाली रुपया ६८. शुष्कता ७१. सुंदर तरुणी ७३. फणसाचा एक प्रकार ७४. गाढव ७५. बगळा ७८. रमणीय, मनोहारी ७९. पद्धत

### शब्दकोडे क्र. 55 चे उत्तर

आडवे उत्तर

१.फटफजिती ४.भारत श्रीलंका ९.कात ११.रसा १३.मन १४.केकवाली १६.फटकळ १७.रमणीय १९.नाक २०.पोकळ २१.करवत २३.साफ २४.तरु २६.साळ २७.वरचढ ३०.पावलोपावली ३२.धकधक ३४.माया ३५.साट ३६.तनमनधन ३८.काल ३९.सदा ४१.वदन ४२.गडप ४३.कनक ४५.हालहवाल ४७.घर ४८.डर ५०.कट ५१.कमानदार ५४.गो ५५.अनुवादक ५७.खडकाळ ५९.रावा ६०.कलम ६१.नगर ६३.मजल ६४.वासा ६५.भार ६६.क्षमा ६७.मळवट ६८.खानदान ७१.मादक ७२.कळ ७३.कासार ७५.दरडोई ७७.करकरीत ७९.भुईसपाट ८०.महिरप

उभे उत्तर

१.फटफटीत २.फटाकडी ३.तीर ५.रमणी ६.तनय ७.लंकेश्वर ८.काका १०.तडकफडक १२.सारक १५.वसंत १८.मळवली १९.नासा २०.पोळपाट २१.कढ २२.वर्ण २५.रुपाया २६.धडपड ३४.माफक ३७.मद ३८.काक ३९.सल ४०.दाहक ४४.नफानुकसान ४५.हाटक ४६.वामा ४९.रखवालदार ५०.कदम ५२.दाखला ५३.रड ५६.वाल ५८.काजळ ५९.राज ६१.नरमाई ६२.रक्षक ६३.मटका ६४.वाखाणणी ६७.मळकट ६९.दादला ७०.नर ७२.करपा ७४.साखर ७६.डोके ७७.कस ७८.तम

# अरेगाव रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात राकाँ.(शरद पवार गट) आक्रमक

## १५ दिवसांत रस्ता न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगावअरेगाव मुख्य रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून या रस्त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन धोक्यात आले आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून वारंवार अपघात घडत आहेत. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देण्यात आले आहे.

या रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी, नागरिक, महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. तसेच स्वामी समर्थ मंदिर, गजानन महाराज मंदिर, आदर्श विद्या मंदिर, सहकार




विद्या मंदिर आदी धार्मिक व शैक्षणिक संस्था या मार्गावर असल्याने सकाळी व सायंकाळी मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघातांची मालिका सुरू असून अनेक निष्पाप नागरिक जखमी होत आहेत. सदर रस्ता सुमारे ५ किमी लांबीचा व ३.७५ मीटर रुंदीचा असून याला पूर्वीच मंजुरी मिळालेली आहे. तरीही अद्याप काम सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे येत्या १५ दिवसांत रस्त्याचे काम तातडीने सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या वतीने देण्यात आला आहे. हे निवेदन प्रदेश सचिव पंकज पळसकर यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी आशिष भंडारे (जिल्हा उपाध्यक्ष विद्यार्थी), अर्जुन पवार (तालुका कार्याध्यक्ष युवक), श्याम पांडव (युवक तालुका अध्यक्ष), विजय सरकते (डोणगाव शहर अध्यक्ष), गणेश बाजड यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

---

## वृत्तविशेष...

### दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्थांनी ३१ जानेवारीपर्यंत नोंदणी करावी



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उपनगर जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात अनेक संस्था विना नोंदणी कार्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण व कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अशा संस्थांची कायद्यानुसार नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर रविकिरण पाटील यांनी केले आहे.

दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली ७ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांची नोंदणी अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कल्याण आयुक्तांना सक्षम अधिकारी घोषित करण्यात आले असून, त्यांच्यामार्फत संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ नुसार संस्थेची नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार मुंबई उपनगर जिल्ह्यातील ज्या संस्थांना दिव्यांग क्षेत्रात कार्य करायचे आहे, त्यांनी संस्थेच्या नोंदणीचा प्रस्ताव संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडे सादर करावा.

नोंदणी न करता कार्यरत असलेल्या संस्थांवर दिव्यांग हक्क अधिनियमनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

### मंत्र्याच्या मुलाच्या कारचालकावर चाकू हल्ला; मृणाल हेब्बाळकर थेट रुग्णालयात, पोलीस घटनास्थळी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कर्नाटकच्या मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर यांच्या पुत्राच्या कार चालकावर अज्ञातानी चाकू हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बेळगावातील क्लब रोडवर ही घटना घडली. या हल्ल्यात चालक बसवंत कडोलकर (३२) जखमी झाले आहेत. अज्ञातांनी चाकू हल्ला केल्यानंतर ते घटनास्थळावरून लगेच पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन हल्लेखोरांचा तपास सुरू केला आहे.

चाकू हल्ला झालेल्या बसवंत याला उपचारासाठी खासगी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे. सध्या बसवंत याची स्थिती धोक्याबाहेर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पैशाच्या व्यवहारातून चाकू हल्ला झाला असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. ओळखीच्या व्यक्तींनीच चाकू हल्ला केला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर यांचा पुत्र अन् युवा काँग्रेस नेता मृणाल हेब्बाळकर यांच्या कारवर बसवंत हा कारचालक म्हणून कार्यरत आहे. चाकू हल्ल्याचे वृत्त कळताच मृणाल हेब्बाळकर यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन कार चालकाच्या प्रकृतीची चौकशी केली. घटनेचे वृत्त कळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी हल्लेखोरांचा शोध घेण्यास प्रारंभ केला. हल्ला झालेल्या परिसरातील सी सी टी व्ही फुटेज पोलीस तपासत आहेत. तर, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. दरम्यान, कॅम्प पोलीस स्थानकात सदर घटनेची नोंद झाली आहे.

### दक्षिण मुंबईतील १३,८०० इमारतींची संरचनात्मक तपासणी, आचारसंहिता संपल्यानंतर निविदा

**मुंबई/प्रतिनिधी :** म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने दक्षिण मुंबईतील अतिधोकायदायक इमारतींचा शोध घेऊन त्यांचा पुनर्विकास तातडीने मार्गी लावण्यासाठी १३ हजार ८०० उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. खासगी कंपनीच्या माध्यमातून ही तपासणी करण्यात येणार असून मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीनिमित्त जारी असलेली आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर या कामासाठी निविदा काढण्यात येणार आहेत. निविदा अंतिम करून या कामासाठी कंपनीची नियुक्ती करण्यात येणार असून त्यानंतर इमारतींच्या तपासणीच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. सर्व इमारतींची संरचनात्मक तपासणी डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे दुरुस्ती मंडळाचे नियोजन आहे.

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर असून १३ हजार ८०० इमारतींमध्ये अंदाजे २० लाख रहिवासी जीव मुठीत घेऊन जगत आहेत. या इमारतींच्या पुनर्विकासाला चालना देण्यासाठी मंडळाने गेल्या वर्षी १३ हजार ८०० इमारतींची टप्प्याटप्प्याने संरचनात्मक तपासणी करून अतिधोकादायक इमारती शोधून काढण्यास सुरुवात केली. पहिल्या टप्प्यात एक हजार इमारतींच्या तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले

---

# जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन; पत्रकार दिन साजरा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी माहिती सहायक सतिष बघमारे, पत्रकार गणेश उबरहंडे, डिगांबर कंकाळ, संजय गवई, वरिष्ठ लिपीक श्रेया दाभाडकर, प्रेमनाथ जाधव, प्रतिक फुलाडी, जयंत वानखेडे, शिपाई राम पाटील, वाहनचालक नामदेव घट्टे यांनी फुलपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

---

### यश स्टारर 'टॉक्सिक' चित्रपटातील मेलिसाच्या भूमिकेतील रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक प्रदर्शित...

**मुंबई /प्रतिनिधी :** दक्षिण सुपरस्टार यश अभिनीत बहुप्रतीक्षित 'टॉक्सिक' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटाचा काही दिवसापूर्वी टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. हा टीझर अनेकांना आवडला होता. आता अनेकजण हा चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्साहित आहेत. चित्रपटाची रिलीज तारीख जवळ येत असताना निर्माते प्रमुख अभिनेत्रींचे फर्स्ट लूक एकामागून एक प्रदर्शित करत आहेत. तारा सुतारियाचा फर्स्ट लूक नुकताच प्रदर्शित करण्यात आला. याशिवाय कियारा अडवाणी, हुमा कुरेशी आणि नयनतारा यांचे फर्स्ट लूकही आधीच प्रदर्शित केले गेले आहेत. आता ६ जानेवारी रोजी 'टॉक्सिक'च्या निर्मात्यांनी साऊथ अभिनेत्री रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक शेअर केला. या चित्रपटात रुक्मिणी वसंतची भूमिका काय असेल याबद्दल आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

---

## एकलव्य इंग्रजी निवासी शाळेत प्रवेशासाठी ३० जानेवारीपर्यंत अर्ज करावा; एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आदिवासी विकास विभागाच्या इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य निवासी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशासाठी परीक्षा दि. १ मार्च २०२६ रोजी होणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज दि. ३० जानेवारी २०२६ पर्यंत प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांनी केले आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, तसेच जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये ५ वी, ६ वी, ७ वी, व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थी सदर स्पर्धा परिक्षेसाठी पात्र राहतील.

या सर्व शाळांतील मुख्याध्यापकांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयाकडे सादर करावे. विहित नमुन्यातील अर्ज संबंधित आदिवासी शासकीय/अनुदानित आश्रम शाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्याकडे विनामूल्य उपलब्ध आहेत. परीक्षेचा अर्ज दि. ३० जानेवारी २०२६ पर्यंत प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावा.

सदर अर्जासोबत बोनाफाईड दाखला, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या वार्षिक उत्पन्नाचा तसेच पालकांचा/ विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला आवेदन पत्रा सोबत जोडण्यात यावा. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा दि. १ मार्च रोजी स. ११ ते दु. १ या वेळेत तसेच इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा दि. १ मार्च रोजी सकाळी ११ ते दु. २ या वेळेत शासकीय आश्रमशाळा, कोथळी, ता.बार्शिटाकळी, जि. अकोला व शासकीय आश्रमशाळा, घाटबोरी, ता. मेहकर, जि. बुलडाणा येथे होणार आहे, अशी माहिती प्रकल्प अधिकारी यांनी कळवली आहे.

---

## डाक विभागात एजंटसाठी अर्ज मागविले; २८ जानेवारीला उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता व क्षेत्र अधिकारी यांची नेमणूक करण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रासह दि. २८ जानेवारी २०२६ रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

थेट अभिकर्तासाठी अर्जाचा नमुना बुलडाणा प्रधान डाक घर किंवा डाक अधीक्षक बुलडाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. एजंट भरतीसाठी उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान दहावी पास असावी. बेरोजगारीत किंवा स्वयंम रोजगारीत शिक्षित युवा, माजी जीवन सल्लागार, इन्शुरन्स कंपनीचे माजी एजंट, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ सेविका, सेवानिवृत्त शिक्षक व इतर अर्ज करू शकतील. उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, परस्पर संबंधाचे कौशल्य, जीवन विम्याबाबत ज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे.

निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रूपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल. सदर रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र अथवा कृषी विकास पत्राच्या स्वरुपात राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ततेनंतर डाक विभागाकडून तात्पुरता परवाना देण्यात येईल. हा परवाना आयआरडीएची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायमच्या परवान्यामध्ये रुपांतरीत केल्या जाणार आहे. ही परवाना परीक्षा नियुक्तीनंतर ३ वर्षाच्या आत पास करणे अनिवार्य राहिल. निवड झालेल्या उमेदवारास ठरविलेले कमिशन दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक, डाक घर कार्यालय, बुलडाणा ४४३००१ येथे विहित नमुन्यातील अर्ज आणि दहावी किंवा बारावी बोर्डाचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, संगणक ज्ञानाचे प्रमाणपत्र, यासह सर्व शैक्षणिक प्रमाणपत्र, तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य संबंधित दस्ताऐवजासोबत दि. २८ जानेवारी २०२६ रोजी ११ ते २ वाजेदरम्यान उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी जवळच्या डाक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे डाकघर अधीक्षक यांनी कळविले आहे.

---

# देवा फाऊंडेशन च्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त बिबी परिसरातील पत्रकारांचा गौरव

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना:** मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त देवा फाऊंडेशनच्या वतीने लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांच्या लेखन व सामाजिक योगदानाचा गौरव करण्यासाठी बिबी परिसरातील सर्व पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन देवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष देवानंद सानप यांनी केले होते. या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार मधुकर मोहीते, काशिनाथ राऊत,भागवत आटोळे, कृष्णा पंधे , ब्रह्मानंद वाकोडे, रमेश खंडागळे, दिलीप राठोड, अशोक मुंडे, सुनील इंगळे, शरद गीते, सुनील काकड, ऋषी दंदाले, गजानन डोईजड, शीलवंत इंगळे, जय जिताडे, कदीर शहा अकबर शहा, रामप्रसाद जाधव, सय्यद जहीर, मिलन चव्हाण, रवींद्र पवार, रोशन चव्हाण,यांच्यासह अनेक अनुभवी व युवा पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात पत्रकारितेच्या सामाजिक जबाबदारीवर, सत्यनिष्ठ व निर्भीड लेखनाच्या भूमिकेवर मार्गदर्शन करण्यात आले. पत्रकार हे समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य करतात, तसेच लोकशाही मजबूत करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व पत्रकारांचा सन्मान करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. देवा फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून, अशा उपक्रमांमुळे पत्रकारांना नवी ऊर्जा व प्रेरणा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

